RNI. MAHMUL02805/2010/33461

Impact Factor - 2.06

ISSN 0976-0377

*International Registered & Recognized Research Journal Related to Higher Education for all Subjects*

# INTERLINK RESEARCH ANALYSIS

**REFERRED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL**

**Vol. VI, Issue : VII**
**Year - 4 (Half Yearly)**
**Jan. 2013 To June 2013**

**Editorial Office :**
'Gyandeep',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Contact :** 02382 - 241913
09423346913, 09637935252,
09503814000, 07276301000

**Website**
**www.irasg.com**

**E-mail :**
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@gmail.com
drkamblebg@rediffmail.com

**Publisher :**
Jyotichandra Publication Pvt. Ltd.,
Latur, Dist. Latur.-415331
(M.S.) India

**Price ₹ 200/-**

**CHIEF EDITOR**

**Dr. Balaji G. Kamble**
Research Guide & Head, Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya, Latur, Dist. Latur (M.S.)
Mob. 09423346913, 09503814000

**EXECUTIVE EDITORS**

**Dr. Aloka Parasher Sen**
Professor, Dept. of History & Classics,
University of Alberta, Edmonton,
(CANADA).

**Dr. Laxman Satya**
Professor, Dept. of History,
Lokhevan University, Loheavan,
PENSULVIYA (USA)

**Dr. Huen Yen**
Dept. of Inter-Cultural
International Relation
Central South University,
Changsha City, (CHAINA)

**Bhujang R. Bobade**
Director, Manuscript Dept.,
Deccan Archaeological and Cultural
Research Insititute,
Malakpet, Hyderabad. (A.P.)

**Dr. Omshiva V. Ligade**
Head, Dept. of History,
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur. (M.S.)

**Dr. Sadanand H. Gone**
Principal,
Ujwal Gramin Mahavidyalaya,
Ghonsi , Dist. Latur. (M.S.)

**Dr. G.V. Menkudale**
Dept. of Dairy Science,
Mahatma Basweshwar College,
Latur, Dist. Latur.(M.S.)

**Dr. Balaji S. Bhure**
Head, Dept. of Hindi,
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur.(M.S.)

**DEPUTY-EDITORS**

**Dr. Murlidhar Lahade**
Dept. of Hindi,
Janvikas Mahavidyalaya,
Bansarola, Dist. Beed.(M.S.)

**Veera Prasad**
Dept. of Political Science,
S.K. University,
Anantpur, (A.P.)

**Dr. Milind Lokhande**
Dept. of Zoology,
Indira Gandhi (Sr.) College,
Nanded, Dist. Nanded.(M.S.)

**Johrabhai B. Patel,**
Dept. of Hindi,
S.P. Patel College,
Simaliya (Gujrat)

**CO-EDITORS**

**Sandipan K. Gaike**
Dept. of Sociology,
Vasant College,
Kej, Dist. Beed (M.S.)

**Dr. Shivaji Vaidya**
Dept. of Hindi,
B. Raghunath College,
Parbhani, Dist. Parbhani.(M.S.)

**Dr. C.J. Kadam**
Head, Dept. of Physics
Maharashtra Mahavidhyalaya,
Nilanga, Dist. Latur.(M.S.)

**Dr. Shivanand M. Giri**
Dept. of Marathi,
B.K. Deshmukh College,
Chakur Dist. Latur.(M.S.)

# शाश्वत विकासासाठी पर्यावरणीय संरक्षण

डॉ.माणिक सोनवणे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,
पूणे, जि. पूणे

19 Research Paper - Pol. Sci.

**प्रस्तावना :**

आधुनिक जागतिक व्यवस्थेमध्ये पर्यावरणीय सुरक्षा आणि शाश्वत विकासाचा विचार केंद्र स्थानी आला आहे. मानवी जातीच्या शांततापूर्ण आणि सर्वांगीण शाश्वत, टिकाऊ व चिरकाल विकासासाठी पर्यावरण संरक्षणासाची अत्यंत गरज आहे. शाश्वत विकास ही बहुआयमी व परस्परावलंबी संकल्पना आहे. या संकल्पनेत वर्तमानकाळातील पिढीबरोबरच भविष्यातील पिढीचा विचार केला जातो. ही संकल्पना नैसर्गिक साधनसंपत्तीचा विवेक बुध्दीने व दुरदृष्टीने वापर करण्यावर अधिक भर देते. परंतु सध्या होत असलेला विकास कुणाच्या तरी विनाशावर अवलंबून आहे. त्यामुळे तो तक्लादू व अल्पजीवी आहे.

सुरूवातीच्या काळात नैसर्गिक साधनधनाची विपूलता होती; काळानूसार लोकसंख्या वाढत गेली. तंत्रविज्ञानाच्या प्रगती बरोबर मनुष्याचा उपभोग घेण्याचा स्तरही उंचावत गेला. एवढेच नव्हे तर सर्वसामान्य जीवनामध्ये कृत्रिम साधनांचे प्रयोग इतके वाढले की त्यामूळे निसर्गच दुषित होऊ लागला. निसर्गापासून मनुष्य दूर जावू लागला. आर्थिक उद्दिष्ट्ये साध्य करण्याच्या धावपळीत पर्यावरणाच्या विनाशाकडे अवनतीकडे त्याचे दुर्लक्ष झाले. भांडवलशाही उत्पादन वाढीच्या हव्यासापुढे नैसर्गिक साधन संपत्तीचा अफाट प्रमाणात वापर वाढला. त्यातूनच निसर्गाच्या अवनतीला सुरूवात झाली. सध्या या स्थितीची धोक्याची घंटा वाजत आहे. म्हणून शाश्वत विकासाची संकल्पना पर्यावरणाच्या संरक्षाशिवाय करणे अवश्यक आहे. म्हणून मनुष्य आणि निसर्गाचे तुटलेले संबंध पून्हा जोडणे, मनुष्याच्या सामाजिक आणि राजकीय जीवनाला पर्यावरणप्रीय आणि विनयशील व विवेकशील बनविणे आवश्यक झाले आहे.

असे व्यापक व सर्वांचा हिताचा विचार करुन विकासाचा गाढा पुढे नेण्याची गरज आहे. हा विचार भारतामध्ये सामुहिक भावनेतून बिंबवणारे मा. अण्णा हजारे यांच्या राळेगणसिध्दी (अहमदनगर-महाराष्ट्र), व भाऊता कोल्याला (राजस्थान) या खेड्यांचा झालेला शाश्वत विकास हे सामुदायिक विकासाचे उत्तम उदाहरण आहे. या दोन उदाहरणाचे अनुकरण संपूर्ण देशाने करणे आवश्यक आहे. एवढेच नाही तर ही काळाची गरज आहे. यासाठी लोकसंख्येवर नियंत्रण, निसर्गातील छोट्या-छोट्या वस्तुतील गुणांची ओळख, व्यक्तिगत उत्तरदायित्व, सामुदायिक उत्तरदायित्त्व, यांच बरोबर मनुष्याला निसर्गाबरोबर जगण्याची अभिलाषा (Living with the Nature) निर्माण करणे गरजेचे आहे.

## शाश्वत विकासाची संकल्पना

मानव हा नैसर्गिक व सामाजिक पर्यावरणात जीवन जगत असतो. आर्थिक विकास आणि पर्यावरण यातील समन्वय साधने आवश्यक असते. याच अनुषंगाने सन १९८७ साली संयुक्त राष्ट्र संघटनेने जागतिक आरोग्य संघटनेचे संचालक जी.एच.ब्रंटलँड यांच्या अध्यक्षतेखाली घ्जागतिक पर्यावरण व विकासङ या आयोगाची स्थापना केली. त्यावेळी या आयोगाने शाश्वत विकासाची संकल्पना विशद केली. ब्रॅटलँड अहवालात असे नमुद करण्यात आले की, शाश्वत विकास म्हणजे असा विकास की जो भविष्यकालीन पिढ्यांच्या स्वतःच्या गरजा पुर्ण करणच्या सामर्थ्याचे तडजोड शिवाय वर्तमानकालीन गरजांची पूर्तता करणे होय. भावी पिढ्यांच्या गरजा भागविण्याच्या क्षमतेला कोणताही धोका न पत्करता लोकांच्या वर्तमान गरजा पूर्ण करणे म्हणजे शाश्वत विकास होय. याच संदर्भत रॉबर्ट ॲलन असे म्हतात की, च्शाश्वत विकास-विकास असा असतो की, मानवी गरजांचे चिरकाल टिकणारे साधन आणि मानवी जीवनाच्या दर्जात सुधारणा साध्य करणारा असतो.छ थोडक्यात शाश्वत विकासाच्या संकल्पनेत उत्पन्नात किती वाढ झाली यांचा हिशोब करतांना पर्यावरणाच्या अवनतीचा खर्च वजा केल्यानंतर जो शुध्द विकास असतो त्याला शाश्वत विकास असे म्हणतात. नैसर्गिक साधनधनाच्या वहनक्षमतेच्या आणि पूननिर्माण क्षमता यावर शाश्वत विकास आधारित असतो.

## शाश्वत विकासाची आवश्यकता :

विकास हा मानवाचा नैसर्गिक हक्क आहे. या हक्काचा उपभोग घेतांना नैसर्गिक साधनधनाचा अमर्यादीत वापर केला जातो. त्यातून पर्यावरणाची अवनती होते. त्यांचा अनिष्ट परिणाम वर्तमान पिढी बरोबरच भविष्यातील पिढीवरही होत असतो. म्हणून विकासाच्या हक्काबरोबर नैसर्गिक कर्तव्य व जबाबदारीची जाणिव होणे गरजेचे आहे. ही जाणिव करून देण्यासाठीच शाश्वत विकासाची नितांत आवश्यकता आहे. भारताच्या संदर्भात विचार केल्यास दारिद्र्य निर्मूलन करण्यासाठी, पर्यावरणीय प्रदुषण कमी करण्यासाठी, जीवनशैलीचे प्ररूप बदलण्यासाठी, आरोग्याचा गुणात्मक दर्जा सुधारण्यासाठी, निसर्गाबरोबर जीवन जगण्यासाठी आणि म. गांधीच्या विचारातील स्वराज्याचे सुराज्यात रूपांतर करण्यासाठी शाश्वत विकासाची संकल्पना विकसित होणे आवश्यक आहे.

RNI. MAHMUL02805/2010/33461
*Interlink Research Analysis*
IMPACT FACTOR 2.06
ISSN 0976-0377
Vol. VI, Issue : VII, Jan. 2013 to June 2013 

भारतातील शाश्वत विकासाची सद्यस्थिती : प्रतिनिधीक उदाहरणे -

शाश्वत विकास आणि पर्यावरणाचे संरक्षण या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. म्हणूनच आंतरराष्ट्रीय पातळीपासून स्थानिक पातळीपर्यंत दोन्ही संकल्पनाचा एकत्रीत विचार केला जातो. भारतामध्ये १९७२ साली पर्यावरण नियोजन व समन्वय राष्ट्रीय परिषद (National council of Environmental Planning and Co-ordination-NCEP) स्थापना केली. तसेच एकत्रित व प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी १९८५ मध्ये भारत सरकाने स्वतंत्र पर्यावरण व वने मंत्रालय सुरू केले. यांच अनुषंगाने प्रत्येक घटकराज्यानी पर्यावरण प्रदुषण नियंत्रण विभाग स्थापन केलेले आहेत. ज्यामध्ये सेंटर फॉर सायन्स ॲन्ड इनव्हारवमेंट (CSE) नवी दिल्ली, सेंटर फॉर इनव्हारवमेंट एज्युकेशन (CEE), बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी (BNHS) इत्यादी संस्थांमधून प्रयत्न केले जात आहे. शासकीय प्रयत्नाबरोबरच अशासकीय संघटनानी (NGO) प्रयत्न केलेले आहेत. ज्यामध्ये आगाखान ग्रामीण मदत कार्यक्रम, विक्रम साराभाई विकास व अन्योन्य क्रिया केंद्र आणि भारतीय उद्योग प्रतिष्ठान सारख्या अशासकिय संघटनानी शाश्वत विकासासाठी खालील काही महत्वाची उदाहरणे व प्रयत्न केलेले आहेत. चिपको आंदोलन ही भारतीय इतिहासातील महत्वपूर्ण घटना आहे. सुंदरलाल बहुगुणा यांच्या नेतृत्वाखाली वृक्षतोडी विरूध्दात केलेले फार मोठे आंदोलन होते. राळेगणसिध्दीत (जिल्हा अहमदनगर-महाराष्ट्र) श्री. अण्णा हजारे यांनी ग्रामस्थाच्या सामुदायिक सहभागातून पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम हाती घेऊन जलसंवर्धन, पडिक जमिनीचा वापर आणि जलसिंचन क्षेत्रात वाढ करून संपूर्ण गावांचा कायापालट केला. हे शाश्वत विकासाचे अनुकरणीय असा आदर्श नमूना आहे. सामुदायिक प्रयत्नातून शाश्वत विकास व पर्यावरणाचे संरक्षण कसे साधता येते यांचे दुसरे उत्तम उदाहरण म्हणजे राजस्थान मधील अलवार जिल्ह्यातील भाऊता कोल्याला हे खेडे होय. केवळ १० वर्षात सामुदायिक भूमिकेतून राजेद्रसिंग यांनी २५ विहिरी, तलाव, बंधारे इत्यादीची निर्मिती करून वाळवंट असलेल्या गावाला आज नंदनवनाचे स्वरूप प्राप्त करून दिलेले आहे. हे घडले ते केवळ आणि केवळ सामुदायिक भूमिकेतून झालेले आहे. केरळ शास्त्र-साहित्य परिषद (१९६७) या परिषदेने सदाहरित वर्षा वनातील वनस्पतींना आच्छादिलेल्या वनांचे संरक्षण करण्यासाठी मोठे आंदोलन उभे केले. मध्यप्रदेशातील होशिंगाबाद१ लाख शेतकज्यानी १९७७ साली नर्मदा नदीची उपनदी देवना व तवा या नद्यांच्या संगमावर उभारल्या जाणाज्या धरणाविरूध्द घमिट्टी बचाव अभियानङ उभे केलेले आहे. श्रीमती मेधा पाटकर यांनी नर्मदा बचाव अभियान गेल्या कित्येक वर्षापासून चालविले जात आहे. गुजरात, मध्यप्रदेश व महाराष्ट्रातील मोठे वनक्षेत्र सरदार सरोवराच्या पाण्याखाली जाणार आहेत. त्यामुळे पर्यावरणाची अवनती होणार आहे ते टाळण्यासाठी आंदोलन चालू आहे. टेहेरि बांध विरोधी संघर्ष (उत्तराखंड) समितीची स्थापना १९७८ मध्ये व्ही.डी. सकलानी यांच्या नेतृत्वाखाली झाली या धरणाचे बांधकाम भूकंप प्रवण क्षेत्रात होत असलेल्या संमिती विरोधी केलेला आहे.

वरील उदाहरणावरुन असे लक्षात येते की, भारतातील शाश्वत विकासासाठी अनेक स्तरावरून प्रयत्न होत आहेत. परंतू त्यासाठी राजकीय व प्रशासकीय इच्छाशक्तीची, जाणिव जागृतिची व सामुदायिक भूमिकेची गरज आहे. सर्व समाज घटकांनी, उद्योग व्यवसायकांनी हा विचार स्वीकारण्याची गरज आहे. आजच्या नैसर्गिक संरक्षाणावर उद्याच्या पिढ्यांचे भवितव्य अवलंबून आहे. म्हणून निसर्ग संवर्धनाचा पुरेसा प्रचार आणि प्रसार करण्याची गरज आहे.

**शाश्वत विकासापूढील आव्हाने :**

आजच्या काळात सर्व देशांचा व सर्व मानव जातीचा सर्वांगीण विकास होणे आवश्यक असल्यामुळे वरील काही संस्था व संघटना शाश्वत विकास आणि पर्यावरणीय संरक्षाणासाठी कार्य करीत आहेत. तथापी हे प्रयत्न पुरेसे नाहीत. शाश्वत विकासाचा विचार पुढे नेण्यामध्ये काही अडचणी व आव्हाणे आहेत ती पुढीलप्रमाणे -

वाढती लोकसंख्या व दारिद्र्य निर्मूलनाचे आव्हान, जलप्रदूषण - दुषित पाण्यामुळे दरवर्षी जवळपास ५ वर्षाखालील १५ लक्ष मुले मरतात, तर २० कोटी माणसाच्या कामाचे तास वाया जातात. दुषित पाण्याचा परिणाम गरिब लोकांनाच होतो. कारण श्रीमंत लोक शुध्द पाण्याची उपकरणे वापरतात. शुध्दपाणी पिऊ शकतात. त्यामुळे पाण्याचे शुध्दीकरणाची फार मोठे आव्हान आहे, वनक्षेत्राचे दरडोई प्रमाण ०.०८ हेक्टर एवढे कमी झालेले आहे. त्यामूळे पाऊसाचा अनियमितपण वाढला आहे. वृक्ष लागवडीची वास्तव अंमलबजावणीचे एक अव्हान आहे, खाजगी संपत्तीच्या फायद्यासाठी (Private Profit) उद्योगपती कृत्रिम इच्छेला उत्तेजन देऊन त्यांच्या पूर्ततेसाठी पर्यावरणाकडे दुर्लक्ष करतात. कृत्रिम इच्छाशक्तीतील पायबंध घालणे हे फार मोठे आव्हान आहे, कृतिम साधनांचा वापर वाढल्यामुळे त्याची योग्य विल्हेवाट लागत नसल्याने प्रदूषण वाढत आहे. त्यावर प्रतिबंध घालणे हे फार मोठे आव्हान उभे आहे.

**सारांश :**

आधुनिक काळात तंत्रविज्ञानाच्या प्रगतीमुळे विकास कार्याला गती प्राप्त झाली असली तरी उत्पन्नाचा हिशोब करतांना पर्यावरणाच अवनतीचा खर्च वजा करण्याचा विचार त्यामध्ये अंतर्भूत नाही. उपयोगाचा दर नैसर्गिक पुनरूत्पत्तीच्या दरापेक्षा अधिक होत आहे. त्यामुळे नैसर्गिक साधनसंपत्तीच्या अवनतीला सुरूवात होत असते. त्यातून पर्यावरणाचे संरक्षण धोक्यात येते. याचा दुष्परिणाम वर्तमान पिढीवरच होत नसून भविष्यातील अनेक पिढ्यांवर होत असतो. म्हणून नैसर्गिक साधनधन टिकवायचे असेल तर आर्थिक व्यवहारा बरोबरच पर्यावरण संरक्षणाची काळजी घेणे गरजेचे आहे. त्यासाठीच शाश्वत विकासाची संकल्पना विकसीत होणे आवश्यक आहे.

भारतामध्ये शाश्वत विकासाच्या संदर्भात अनेक दृष्टिकोणातून प्रयत्न केले जातात परंतू सामुदायिक भुमिकेतून प्रयत्न कमी पडत आहेत. त्यासाठी मानवी दृष्टिकोन, कल्याणकारी विचार, कौशल्य आणि

प्रशिक्षण यामध्ये परिवर्तन अपेक्षीत आहे. यासाठी पर्यावरण शिक्षण हा शिक्षणचा अविभाज्य भाग बनला पाहिजे. राजकीय इच्छाशक्ती, लवचीक व गतीशील धोरणे आणि उचित तंत्रज्ञानाची निवड या आधारे शाश्वत विकास व पर्यावरणाच्या संरक्षणाचे ध्येय गाठता येईल. त्याचबरोबर पुढील काही उपाययोजनांच्या माध्यमातून शाश्वत विकास आणि पर्यावरणाच्या संरक्षणाचे उद्दिष्ट गाढता येवू शकते.

१) लोकसंख्येवरील नियंत्रण संबंधीत कायद्याची कडक अंमलबजावणी करणे.

२) पर्यावरण प्रदुषण रोखण्यासाठी प्रयत्न करणे त्यासाठी लोकशिक्षण देणे.

३) वृक्षदागवड प्रत्येक व्यक्तिला अनिवार्य करावी.

४) स्वयंचलित वाहनाची देखभाल करावी. वाहानावर प्रदूषण कर आकारावा.

५) वाढत्या नागरिकरणामुळे व बदलत्या जीवनशैलीमूळे कचज्याचे प्रमाण वाढत आहे. म्हणून कचज्याची योग्य विल्हेवाट लावावी.

६) भाविपिढीच्या कल्याणाचा विचार करून नैसर्गिक साधनसंपत्ती चा काटकसरीने वापर करावा.

७) विकासाच्या योजना, धोरणात्मक निर्णय आणि मानवीदृष्टीकोन यांचा न्याय तत्त्वावर मांडणी करावी.

८) निसर्गापासून मनुष्य दुर गेला आहे. त्याला निसर्गाकडे आकर्षीत केले पाहीजे.

९) धोरण निर्मितीत महिला आणि तरूणांचा सहभाग वाढविला पाहिजे.

१०) शाश्वत विकास आणि पर्यावरणाचे संरक्षणासाठी सामुदायिक भूमिकेतून कार्य केले पाहिजे.

## संदर्भ सूची

१) देशपांडे श्रीधर व विनायक, भारतीय अर्थव्यवस्था, हिमालय पब्लिशिंग हाऊस, मुंबई, २००४, पृ.४७५.

२) सवदी अरूण, आपले पर्यावरण, निराली प्रकाशन, पूणे, २००७, पृ. १३१.

३) झामरे जी.एन. (डॉ.), भारतीय अर्थशास्त्र, विकास व पर्यावरण, पिंपळापूरे पब्लिशर्स, नागपूर,२००४, पृ.४१०.

४) कुरूक्षेत्र (हिंदी), पर्यावरण विशेषांक, दिसंबर - २००४.

५) यशदा, यशमंथन, ऑक्टोबर - डिसेंब - २००९.

६) योजना (हिंदी), जुन २०१०.

७ )http:/www.invironmentproteltion-org/sustainable_development

८) http:/www.sustanabledevelopment.nic.in/invironment

९) पर्यायी विकासाची दिशा २००१

१०) राज्यशास्त्र शब्द कोश-व्हीरा-पळशीकर